# बॉम्बे प्रांतातील फातिमा शेख यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

**प्रा. प्रियांका मधुकर गायकवाड**
देशभक्त संभाजी गरड महाविदयालय,
मोहोळ, सोलापूर

**प्रस्तावना :**

आजचे युग हे विज्ञानाचे, प्रगतीचे आणि स्पर्धेचे युग आहे. शिक्षण म्हणजे जीवनाचा प्रकाश मानणारे युग आहे. या शिक्षण प्रकाशाच्या माध्यामाने आज प्रत्येक व्यक्ती आपले जीवन प्रकाशमान व गतिमान करीत आहे. स्वत:चे व्यक्तिमत्व तेजोमय बनविण्याचा प्रयत्न करीत आहे. " Knowledge is Power" याचा प्रत्यय समाज जीवनात मोठया प्रमाणात दिसून येत आहे. शिक्षणाला मानवाचा तिसरा डोळा मानले जात आहे. या तिस-या डोळयाच्या सहायृयाने आजचा स्त्री – पुरुष समाज आपले स्वजीवन पर्यायाने राष्ट्रजीवन समृद्ध करीत आहे. शिक्षणाला विकासाचे शस्त्र व शास्त्र मानले जात आहे. विशेष्त: भारतीय हिंदू स्त्रिया आणि शूद्रादिशूद्र समाज ज्यांना हिंदूधर्म, परंपरा आणि मूल्ये यानी शिक्षणाचे किंवा ज्ञान भांडाराचे कोठार बंद केले होते. ज्यांना हजारो वर्षे ज्ञानाविणा अज्ञानाच्या अंधकारात डांबून गलाम बनविले होते असा हा समाज आल शिक्षणाचा "महायज्ञ" पेटवून अहोरात्र कष्टाच्या समिधा अर्पण करुन आपले जीवन आणि समाजजीवन प्रकाशमान बनवीत आहे. शिक्षणाच्या दिव्य आणि भव्या शक्तीने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये मुक्तपणे संचार करीत आहे. हजारो वर्षे पिंज-यात कोंडून ठेवल्यानंतर मुक्त केलेल्या पक्षाप्रमाणे त्यांचा आनंदआज दिव्गूणीत होत आहे. त्यांच्या पंखांना क्षितीज आज खुणावत आहे. हिमालयाचया उंच शिखरावर प्रगतीची उंच भरारी मारण्याचे स्वप्न आज तो पहात आहे. त्या वंखांचे बळ आज शिक्षणाशिवाय अन्य नाही याची जाणीव त्यास प्रकर्षाने होत आहे. अणि म्हणूनच ज्ञानाचा आस्वाद मनसोक्त घेतला जात आहे.

आज विसाव्या शतकात उत्तरार्धात भारतीय स्त्रिया आणि शुद्रातिशुद्र स्त्री – पुरुष समाजान विविध भूमिका बजावताना दिसत आहेत. स्त्रिया राष्ट्रपती, पंतप्रधान पदापासूनते खेडेगावात ग्रामपंचायतीतीन सरपंच पदापर्यत, कुटुंबातील पतीचया खांदयाला खांदादेण्याच्या मुख्या पदापासून ते पंचायत समितीचया सभापती पदापर्यत, स्त्री कामदारापासून ते आज आमदार, खासदार नी वारसदारापर्यत झाडूवाली पासून डॉक्टर , पायलट, इन्सपेक्टर, कलेकटर अशा विविध प्रशासकीय पदापर्यत स्त्रियांनी उंच भरारी घेतली आहे. हजारो वर्षे महान संस्कृतीची शिक्षा भोगणारी स्त्री देशाचे प्रशासन स्वसामर्थ्याने सांभाळताना आढळून येत आहे. आज जीवनातील असे एकही क्षेत्र नाही जिथे स्त्रीया पोहचल्या नाहीत. भारतीय सित्रयाची आजची ही प्रगती आणि उन्नत अवस्था सातत्याने व्यापक होत आहे हे निर्विवाद सत्य आहे.

अर्थातच स्त्रियांच्या या प्रगत आणि व्यापक शैक्षणिक, सामजिक, अर्थिक उन्न्त अवस्थेला अनेक चढउतारांवरुन प्रवास करावा लागलेला आहे. स्त्रियांच्या पदोन्नतीचा हा आलेख कालचक्राप्रमाणे विविध स्वरुपाची वळणे घेऊन तयार झालेला आहे. स्त्री जीवनाची ही प्रगती जादूची कांडी फिरवली व झाली अशा स्वरुपाची कदापी नाही. या उन्नताव्यस्थेला अनेक युग स्त्री – पुरुषांचया त्यागमयी अणि समर्पित जीवनाचे बलिदान पायाभूत आहे. आणि म्हणूनच स्त्री- शुद्राचे जीवन अज्ञान, अंध:काराच्या भयाणयुगातून प्रकाशाकडे ते एका प्रक्रियेच्या स्वरुपात आलेले आहे. या विकास प्रक्रियेला अनेक कालखंडातून काटेरी वाटेने पायपीट करावी लागलेली आहे. म्हणूनच स्त्रियांच्या शिक्षणपर्वाच्या आणि सामाजिक स्थानांबद्लच्या विविध कालखंडाचा संक्षिप्त असा ऐतिहासिक आढावा घेतल्याशिवाय स्त्री शिक्षणाच्या आजच्या प्रगत आणि उन्नत अवस्थेच्या प्राप्तीसाठी समर्पित जीवन जगणा-या ज्ञानज्योती सावित्रीच्या महान तेजस्वी कार्याचे मोल कळणार नाही. स्त्री – शुद्रादिशुद्रासाठी त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचे योग्या मूल्यमापन होणार नाही. वास्तविक पाहता ज्या काळात व पारिस्थेमध्ये त्यांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. त्या ऐतिहासिक कालखंडातील आणि त्यापूर्वीच्या कालखंडातील स्त्री जीवनाच्या संक्षिप्त आढावा घेणे गरजेचे ठरणारे आहे म्हणून त्या इतिहासाकडे प्रथम आपण पाहू या. ज्ञानदानाच्या कार्यासोबत त्यांनी केलेल्या अन्य सामाजिक सुधारणेच्या कार्याचा आढावा घेणे उचितच नव्हे तर अपरिहार्य आहे. त्यातूनच त्यांच्या समग्र व्यक्तिमत्वाच्या विविध अंगाचा परामर्श घेता येऊ शकता.

**संशोधनाची उदिष्टये :**

१) भारतातील स्त्रियांच्या विविध कालखंडातील स्थितीचा अभ्यास करणे.

२) स्त्रियांच्या शिक्षणाचा आढावा करणे.

३) पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या शिक्षणाबाबतचा सामजिक दृष्टिकोन अभ्यासणे.

४) स्त्रियांच्या शिक्षणात येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.

**संशोधन गृहीतके :**

१) स्त्रियांच्या शैक्षणिक विकास पुरूषांच्या तुलनेत कमी आहे.

२) स्त्री शिक्षणाच्या अभावामुळे कमालीची उदासीनता आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तूत शोध – निबंध तयार करण्यासाठी विविधसंदर्भ, ग्रंथ, मासिक, तसेच शासकीय अहवाल व इतर प्रकाशित साहित्याचा उपयोग केला आहे.

प्राचीन भारतातील वैदिक काळातील स्त्री शिक्षण पद्धती (इ.स.पू.८०० पर्यत) :

एकूणच जगातील स्त्री शिक्षणाचा विचार करता वैदिक काळातील स्त्रियांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध होत्या असे वाटते. जरी आजच्याप्रमाणे सर्व क्षेत्रांतील ज्ञान त्यांना घेता येत नसले तरी दैनंदिन जीवन सुरळीत जगण्यासाठी, व्यवहारापयोगी तसेच आत्मकल्याण साधण्याच्या दृष्टिने उपयुक्त ज्ञान मिळविता येत असे.

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचे उदिष्टे :

१. शिक्षणाने मोक्ष प्राप्त करून घेणे.

२. धार्मिक वृत्ती निर्माण करणे.

३. चारित्र निर्माणे करणे.

४. व्यक्तिमत्वाचा विकास घडविणे.

५. सामाजिक कर्तव्यांची ब ओळख करुन देणे.

६. संसकृती रक्षण व संस्कृती संवर्धन करणे.

भारतात वैदिक कालीन स्त्रियांना मान होता त्यांना मुलांच्या बरोबरीने आवश्यक असे शिक्षण मिळत असे व उपनयनाचा अधिकार होता. उपनयनांनतर त्यांच्या अध्ययनास सुरूवात होई बहमवादिनी व सधोदया असे विदयार्थ्यानीचे दोन प्रकार होते. ब्रम्हवादिनी मुली आजन्म ब्रम्हचर्य पाळून वेद विदयेचा व ब्रम्हविदयेचा अभ्यास करीत.

लोपमुद्रा, विश्र्वारा च घोषा या विदुषीनी रचलेल्या ऋचा ऋगवेदात आढळतात. ब्रम्हयज्ञाच्या वेळी केल्या जाणाऱ्या सुलभ मैत्रयी, गार्गी, व वाचनक्नवी या विदुषी स्त्रियांची नावे आढळतात. याज्ञवाल्क्य यांची पत्नी मैत्रेयी आत्म ज्ञानविषयक जिज्ञासेबदृल प्रसिद्ध होती.

विदेह जनकाच्या राजसभेत जी आध्याम्कि चर्चा चाले. तिच्यात गार्गी प्रमुख होती ब्रम्हवादिनी पुरुषाप्रमाणेच अध्यपनाच्या व्यवसाय करीत त्यांना उपाध्याय किंवा आचार्या अशी संज्ञा होती. वैदिक कालखंडात बहूतेक स्त्रियांना महत्त्वपूर्ण मर्यादांशिवाय शिक्षण घेण्याची परवानगी होती. त्यानंतरच्या काळात स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले नाही. यावेळी महिला विदृवानही उपिस्थित होते. पूर्वीचे तत्वज्ञान आणि धर्मशास्त्राचे आजीवन विदयार्थी होते. लग्न होईपर्यत सदोदार अभ्यास चालू ठेवायचे. अपला घोष, आणि विश्र्वारा यांसारख्या अनेक महिला कवयित्री आणि तत्वज्ञ होत्या.[१]

**भारतातील जैन व बौद्ध काळातील स्त्रीशिक्षण पद्धती :**

बौद्ध आणि जैन कालख्ंडामध्ये मात्र स्त्रियांचया जीवानाला प्रापत होणारे वातावरण निर्माण झाले होते असे ततकालीलन वाड:मयाच्या वरुन दिसून येते. या दोन्ही धर्मसंस्थापकांनी स्त्रियांना शैक्षणिक व आध्यात्मिक स्वातंत्र्य दिले होते. महात्मा गौतम बुध्दांनी सित्रयांच्या बौध्द्ध भिक्षुनीचा अध्यात्मिक मार्ग खुला केला होता. या दोन्ही धर्मसंस्थापकानी सित्रयांचे स्वातंत्र्य राखण्याचा प्रयत्न केला.

महात्मा गौतमबुद्धानी आपल्या धम्माचा पाया समानता हाच पाया मानला होता. सामाजिक व लिंगभेदात्मक विषमतेला धम्मात थारा दिला नव्हता. त्यामुळै तत्कालीन सित्रया व शुद्रादिशूद्रान शैक्षणिक व अध्यात्मिक गुणवत्ता प्रापत करण्याची संधी मिळली होती. सुरुवातीला भिख्खू संघात स्त्रियांना प्रवेश देणे त्यानी अमान्य के ले होते. त्याचे कारण तत्कालीन समाजातील स्त्रियांबाबतचे असलेले गौणतवाचे व कनिष्ठत्वचाचे विचार हेच होय. बौद्ध भिख्खूचे भटकंती च खडतर जीवन लक्षात घेता सित्रयांच्या संरक्षणाचा प्रश्नच महात्मा गौतम बुद्धांना नकारात्मक भूमिका घेण्यास भाग पाडत होता असे वाटते. अर्थातचत्यांचा हा नकार विचारांती पुढे होकारात बदलला दिसतो आणि स्त्रियांचे संपूर्ण जीवनस्वातंत्रय त्यानी विविध पातळीवर केल्याचे दिसते.

बौद्ध काळात "कामंदकी" नावाची बौद्ध भिक्षुनी त्यावेळी अध्यापनाचे कार्य करीत असे. शेकडो विदयार्थी तिच्याकडे ज्ञानार्जनासाठी येत असत. अध्यापनाचे पवित्र कार्य करणाक्‍-या सित्रयांना त्याकाळी "उपाध्याया" म्हणून ओळखले जात होते. बौद्ध विहारात शिक्षण कार्य चालवले जात असे. तिथेच राहून आनेक स्त्रया आपलया आवडज्या विषयात पंडिता होत होत्या. अनेक स्त्रया व्रतस्थ राहून प्रेम, विश्वबंधुता, समाता, करूणा, दया, क्षमा, शातीचा संदेश देणयाचे महान कार्य करुन आपले जीवन पाहून घेत असत. खुद्द महात्या गौतम बुद्धांची पत्नी व माता मावशी यांनीही कार्या केले होते. विदयादानेच आणि विदयार्जनाचे संपूग्र सवांतंत्रया बौद्ध काळात भारतीय सित्रयानं ा होते आणि इतिहासाच्या पानावरून साक्ष भेटते भारतीय स्त्रियांच्या बौद्धिक क्षमताचा सर्वागीण विकास या काळात होत होता याची खात्री पटल्याशिवाय राहत नाहीत.[२]

**भारतातील स्मृतीकाळ स्त्रीशिक्षण पद्धती (इ.स. पू. ८०० – इ.स. ३००) :**

स्मृती निरनिराळ्या काळांत रचल्या गेल्या आहे. त्यापैकी काही (गौतम, आपस्तंब, मनु ) पहिल्या दुस-या शतकांत रचल्या गेल्या. त्यातीन त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोन पुरुषांच्या एक साधण एवढाच मर्यादित होता. मुलीच्या दृष्टिने ते अंधारयुग होते या काळात स्त्रियावर अनेक निर्बंध लादले गेले. राजघराण्यातील मुली, सरदार सरजांमदाराच्या मुली आणि गणिका व तत्सम महिला यांना शिक्षकांकरवी शिक्षण मिळत असे अशा काही सुविधा कवयत्रिनी धर्मशास्त्र तत्वज्ञानवादी विषयांचा व्यासंग करून काव्यनिर्मिती केली. या काळातील रेवा, रोहा, माधवी, अनुलक्ष्मी, पहई, बद्धवही आणि शशीप्रथा या सात कवयित्रींचा उल्लेख हालच्या गाथासप्तशती मध्ये आढळतो.[३]

**भारतातील मुस्लीमकालीन स्त्री शिक्षणपद्धती :**

भारतामध्ये इ.स. १२००- १७०० या मध्ययुगीन कालावधी दरम्यान मुस्लीम राजवट होती. ती प्रामुख्याने दिल्ली सल्तनत व मुगल काळ या दोन मुस्लीम राजस्तांत विभागली होती. मात्र सुरुवातीच्या काळात शिक्षकणाकडे फारसे कोणी लक्ष दिले नाही. पुढे मध्ययुगीन मुस्लीम काळातील शिक्षणाचा उदय धर्मप्रसारासाठी होऊ लागला. त्यावेळी शिक्षणाकडे धर्मप्रसाराचे एक प्रमुख व प्रभावी साधन म्हणून पहिले जाई. शैक्षणिक आणि धार्मिक सूचनांचा आदर केला जाई. या काळात मुस्लिम शिक्षणाचा फारसा प्रसार झाला नसावा. तरी मुस्लीम कालीन शिखण उत्मप्रतीची होते. आणि मुस्लमांनी अंमलातील सुलतानांनी मक्तब "प्राथमिक विदयालय" खानकाई दरगाह अणि विशेषत: मद्रसा महाविदयालये दिल्ली, लाहोर, आग्रा, जौनपूर येथे सुरू केल्या होत्या. केवळ दिल्लीत त्यावेळी १००० जास्त मद्रसा होत्या. या शैक्षणिक संस्थामध्ये अरबी, फारसी, मुसलमानी, धर्मशास्त्र, न्यायशास्त्र यांचे मानधन मिळत असे. लहान खेडयांतील आणि शहरातील मुसलमानी वस्त्यांत मक्तबा असत. शिक्षणाची सुरुवात "बिस्मिल्लाह" या संस्काराने होत असे. उत्तमहस्ताक्षर, निर्दोश शब्दोच्चार, वाचन, लेखन, पाठांतर, गणित व कुराणतील आयते यांवर भर दिला जात असे. मदरसांमध्ये उच्च शिक्षणाची सोय होती. याठिकाणी कुराण, हदीस (पैगंबराची वाचने) मुसलमानी विधी आणि अरबी भाषा प्रामुख्याने शिकवली जात. शिवाय व्याकरण, तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, भौतिकशास्त्र, साहित्य, न्यायतत्तवे, विज्ञान व युनानी यांच्या उच्च शिक्षणात समावेश होता. फारसी व अरेबिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम होते. पुढे मोगल काळात १५२६ – १७०७ सर्वसामान्यांच्या शिक्षणाची प्रयत्न केले तरी सरकारमान्य विदयालये थोडीच होती. उच्च शिक्षणासाठी नंतरच्या सम्राटांनी विधायक प्रयत्नही केले नाहीत. ग्रामीण भागात मशिदीतुन मक्तब असत. त्यांतू मुख्यतत्वे धार्मिक शिक्षणावर भ्र असे. मक्तब व मदरसाठीच मुसलमांनाची खरी शैक्षणिक केद्रे होती. अकबर, शहाजहान, व जहॉआरा यांनी आग्रा येथे मदरसे स्थापन केले. आग्रा, दिल्ली, जौनपूर, सियालकोट, अहमदाबाद ही इस्लांमची अध्यनाची केंद्रे होते.

इस्लाम धर्म याचा प्रसार करणे, ऐहिक जीवनात प्रगती करणे ही तत्कालीन शिक्षणाची ध्येय होती. ती साध्य करण्यासाठी विदवान लोकाची शिक्षक पदावर नेमणूक केली जाई. जुन्या शिक्षकांचे अनुकरण करुन नवीन शिक्षक तयार होत. शिक्षक विदयार्थ्याच्या अडचणी सोडवित व त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन देत. पिदयार्थ्यामध्न हुशार विदयार्थ्याची निवड करुन त्यांच्या कडून इतर विदयार्थ्याना शिकवले जात असे याप्रमाणे वर्गनायक पद्धती अस्तित्वात होती. तेथे शिक्षक व विदयार्थी एकत्र राहत असल्यामुळे त्याच्यात पिता-पुत्रांप्रमाणे संबंध होते. कडक शिस्तीवर भर दिला जाई. सुखी जीवन व धार्मिक शिक्षण यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न मुस्लिमकालीन शिक्षणपद्धतीत केला गेला.

जो ज्ञानाचा शोध घेतो, तो अल्लाहची उपासना करतो, अशी मुस्लिमांची श्रद्धा असल्यामुळे सक्तीच्या शिक्षणावर भर दिला जात असे. भारतात मुस्लिम सत्तेच्या स्थापनेपूर्वीच अन्य देशात मुस्लिम शिक्षणाला सुरुवात झाली होती, मुहम्मद घोरी याने भारतात अजमेर येथे मदरसा स्थापन केली. फिरोजशाह यांनी मुस्लिम शिक्षणाचा विकास करण्याकरिता सुमारे ३० मदरसा सुरु केल्या. दिल्लीतील फिरोजशाह मदरसात शेख अब्दुल्ला नावाच्या विद,वान प्राचार्याने तर्कशास्त्र विषयाचा विस्तार करुन त्यात काजी अझुददीन यांच्या मतल नामक ग्रथांचा समावेश केला, जौनपूर हे मुसिलम शिक्षणाचे महत्तवाचे केद्र होते. मशिदीमध्ये छात्रालये होती मदरसा प्रामुख्याने शहरी भागातच होत्या. महमुद गावान यांनी १४७९ मध्ये बिदर कर्नाटक येथे स्थापन केलेल्या मदरसा अल्पावधीत नावारुपास आल्या. इ. स. १५२० मध्ये जयपूरजवळील नरनौ या गावात शेरशहा यांनी एक मदरसा सुरू केली. नरेद्रनाथ यांच्या उल्लेखावरून अकबराच्या कारकिर्दित १५४२-१६०५ मुसलमान एकाच मदरसात फारसी भाषा शिकत होते, अकबर बादशहाच्या आणि त्यानंतरच्या काळात मदरसात धर्मशास्त्रातशिवाय तर्कशास्त्र व तम्वज्ञान यासारख्या बुद्धिमान विषयांना योग्य तो मान दिला जात असे. तसेच फारसी साहित्यातील गुलिस्तान बोस्तान आणि दिवाने हाफिज यांसारखे ग्रंथ शिकवले जात. सम्राट अकबर यांनी आपल्या काळात अनेक शैक्षणिक बदल व सुधारणा केल्या होत्या. त्यांना शिक्षणात फार रुची होती. त्यांनी मुसिलम अभ्यासक्रमात भारतीय तत्वज्ञान, नीतीशास्त्र, भौतिकशास्त्र, राज्यशासत्र इ. जीवनाभिमुख विषयाचा समावेश केला होता. भाषा मंडळ स्थापन करुन अन्य भाषिक उत्कृष्ट ग्रंथाचे फारसीमध्ये भाषांतर करुन घेतले. त्यांच्या काळात मुस्लिम पाठयक्रम लवचिकहोता. त्यामुळे विदयार्थ्याना आपल्या आवडीनुसार शिकता येत असे. भारतात आग्रा, फतेहपूर,गोवलकोंडा हैद्राबाद इ. ठिकाणी मुस्लिम शिक्षणाची केंद्रे होती.[४]

**भारतातील ब्रिटिशकालीन स्त्री शिक्षणपद्धती :**

लॉर्ड विल्यम बेंन्टीक यांचया शासनकाळात शासनाच्या शैक्षणिक धोरणात बदल झाला. म्यानी थॉमस बॅबिंग्टन मेकॉले या प्रसिद्ध शिक्षणतंत्राची पब्लिक इन्सट्रक्शन कमिटीच्या चेअरमनपदी नियुक्ती केली. म्यावेळेस समितीत पौर्वात्य व पाश्चिमात्य शिक्षणअसे दोन प्रकार पडले.

ब्रिटिश वसाहवादी शसकांनी शिक्षणामध्ये रस दाखविले नाही. पण सर्वप्रथम ख्रिश्चन मिशनरीज पुढे सरसावले. बॅप्टीस्ट मिशनरी विल्यम केरी हे इसवी सन १७९३ मध्ये भारतात आले. त्यानी त्याच्या मित्रांच्या सहकार्याने सन १८०० मध्ये सेरामपूर येथे बॅप्टीस्ट मिशनरीची स्थापन केली त्यांच्या उत्साहामुळे आसपासच्या ठिकाणी ब-याच या प्राथमिक शाळा सुरु झाल्या त्याकाळात काही उदारमतवादी भारतीय आणि परकियांनी इंग्रजी शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी अशासकीय शाळांची स्थापन केली. काही उत्साही भारतीय आणि सैनिक इंग्रजानी पुढे येवून १८१७ मध्ये कोलकत्ता येथे हिंदु कॉलेजची स्थापना केली जे आताचे प्रेसिडेन्सी कॉलेज होय.

सन १८१३ च्या चार्टर ॲक्ट नुसार भारतीय शिक्षणच्या विकासासाठी एक लाख रु. देणगी प्रतिवर्ष याप्रमाणे निधी मंजुरी देण्यात आली काही जणांचे असे म्हणणे होते की, ही रक्कम इंग्रजी शिक्षणासाठी खर्च करावे ही रक्कम पौर्वात्य शिक्षणावर खर्च करण्याचे ठरविण्यात आले.

सन १८३५ मध्ये मेकॉले यांनी इंग्रजी शिक्षणाचा पाया जोरदार पणे पुरस्कार केला, उच्च व मध्यमवर्गीय विदयार्थ्याचया छोटछोटया गटांना योग्य शिक्षण दिल्यास ते "लॉ ऑफ इन्फील्ट्रेशन" प्रमाणे जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचेल असा त्यांचा विचार होता. हा नियम इन्फील्ट्रेशन थिअरी म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांना ब्रिटिश सरकारला मदत करण्यसाठी

कृष्णवर्णीय युरोपीयनांची निर्मिती कराचयाची होती. सरकारने मेकॉले यांचा प्रस्ताव स्वीकारावा त्यानंतर इंग्रजी शिक्षण, इंग्रजी भाषा व विज्ञान यांचा वेगाने प्रसार होण्यास सुरुवात झाली. उचच शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी चार्ल्स वूड यांनी केलेल्या सूचना व शिफारशी अत्यात महत्तवाचा ठरला. त्यांचा शिक्षणविषयक प्रसताव हा "वूड चा खलिता १८५४" म्हणून ओळखला जातो. यामध्ये त्यांनी प्राथमिक ते विदयापीठ स्तरापर्यतचे शिक्षण नियंत्रित करणयासाठी काही सूचना केल्या त्यात विदयार्थ्यांना इंग्रजीतसेच मातृभाषेतून शिक्षण देण्याची सूचना करण्यात आली. त्यानुसार सन १८५७ मध्ये शिक्षण विभागाची स्थापन करण्यात आली. व मुंबई, कोलकत्ता, मद्रास विश्वविदयालयाची स्थापना करण्यात आली. इसवी सन १८८२ मध्ये लॉर्ड रिपन यांच्या काळात सर विल्यम हंटर यांच्या नेतृत्वाखाली हंटर कमिशनची स्थापना करण्यात आली. म्यात १८८४ मध्ये या आयोगाच्या अहवालात विविध गोष्टी नमुद करण्यात आल्या. शाळा व महाविदयालयांना शासकिय अनुदान देण्यात येईल, सरकारी निर्बंध उठविण्यात येतील प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी ही नगरपरिषद आणि जिल्हाबोर्ड यांवार सोपविण्यात येईल या बाबीचा त्यात समावेश हाता. इसवी सन १९०२ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी सर थॉमस राल्फ यांच्या नेतृत्वाखाली राल्फ कमिशनची स्थापना केली यालाच "भारतीय विदयापीठ आयोग" असे म्हणतात. १९०४ साली विदयापीठ कायदा पास होऊन १९१७ साली सर मायकेल सॅडलर यांच्या मार्गदर्शनाखाली एक आयोग नेमण्यात आला. ज्याला कोलकत्ता विदयापीठ आयोग असे म्हणतात.ब्रिटिश शासनकालीन शिक्षणाचा हा प्रवास भारतातील शिक्षणपद्धती मध्ये रुजविण्यात आला.[५]

**फातिमाजी चे जीवन चरित्र कार्य :**

फातिमा शेख यांचा जन्म ९ जानेवारी १८३१ मध्ये पुण्यात झाला. त्या काळात स्त्रीयांनाही शिक्षण देण्याची गरज आहे ही कल्पनाच नव्हती. महिलांना घराच्या हद्दीत ठेवले जाते होते आणि त्यांना अभ्यास करू दिला जात नव्हता. सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांनी मिळून अस्पृश्य, मुस्लीम स्त्रिया आणि बालके यांना वर्ग, धर्म किंवा लिंगाच्या आधारावर शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला. या योगदानासाठी फातिमा शेख या आधुनिक भारतातील पाहिल्या महिला १९४८ मध्ये मुलीसाठी भारातातील पहील्या शाळांपैकी एक सह स्थापण केली. आणि तिचे नाव स्वदेशी लायब्ररी ठेवले. फातिमा शेख आणि सावित्रीबाई फुले यांची भेट झाली. जेव्हा त्या दोघीनी सिथिया फरार या अमेरिकेत मिशनरीदवारे चालवल्या जाणा-या शिक्षक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतला. फातिमा शेख यांनी जयोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना अशावेळी पाठिंबा दिला. जेव्हा काही कटटरवादयांनी त्याची महिला शिक्षित करण्याची मोहिम आवडली नाही. त्यामुळे दोघांनाही घराबाहेर काढण्यात आले. मग फातिमाजीनी यांनी या दोघांना आपल्या घरात राहण्यासाठी जागा तर दिलीच. पण मुलींच्या शिक्षणासाठी पुण्यात शाळा उघडण्याचीही जागा दिली. त्यावेळी शुद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. अशा प्रतिकुल परिस्थितीत फातिमा शेख केवळ शाळेतच शिकवत नसून प्रत्येक घरोघरी जावून मुलींना शिक्षणाचे महत्तव समजावून सांगून म्यांना शिखण घेण्यास प्रवृत्त करत होत्या.त्यामुळे त्यांना समाजातील काही घटकांच्या रोषाखाली सामोरे जावे लागले. सावित्रीबाई फुले यांनी स्थापन केल्ल्या पाचही शाळांमध्ये त्यांनी शिक्षणाच्या प्रसाराचे काम केले. त्यांनी कधीही कोणत्याही मुलामध्ये धर्म जातीच्या आधारे फुट पाडली नाही तर प्रत्येक धर्माचया प्रयत्नांना सत्यशोधक समाजाची चळवळ म्हणून मान्यता मिळाली शेख यांनी घरोघरी जावून त्यांच्या समाजातील दलितांना स्वदेशी ग्रंथालयामध्ये शिकवण्यासाठी आणि भारतीय जातीव्यवस्थेचया कठोरतेपासून वाचवण्यासाठी आमंत्रित केले त्याला मोठया कटटरपंथीयांच्या प्रतिकारलाही सामोरे जावे लागले वण फातिमाजीनी स्त्री शिक्षणासाठी लढण्यात कधीच मागे हटल्या नाहीत.

**फातिमाजी चे शैक्षणिक कार्य :**

१८४७- १८४८ हा जागतिक इतिहास ढवळून काढणारा कालखंड होता. अमेरिकेतील निग्रोना मिळणारी अमानुष वागणुक आणि तया अनुषगांने उदभ्वलेले अमेरिकन स्वातंत्रययुद्ध हे याच दरम्यानचे होते १८४८ कामगारांना आपल्या न्याय हक्काची जाणीव करुण देणारा व परंपरागत दास्तयत्वाच्या विरोधात जावून बंडाचे निशाण रोवणारा कम्युनिस्ट मॅनिफेस्टो देखील १८४८ सालीच प्रसिद्ध झाला होता. याचवार्षी तात्यासाहेब भिडे यांच्या वाडयात पहिली मुलीची शाळा ज्योतीराव फुले यांनी सुरू केली होती. १८४८ या वर्षात महात्मा फुले यांनी एकुण शाळा स्थापन केल्याची नोद आहे.

१) १ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाडा, पूणे
२) १ मे १८४८ रोजी हडपसर, जि. पुणे
३) १५ मे १८४८ रोजी महारवाडा , जि. पुणे
४) ५ डिसेंबर रोजी ओतुर, जि. पुणे
५) २० डिसेंबर १८४८ रोजी सासवड, जि. पुणे
६) १ जुलै १८४९ रोजी अल्हाटाचे घर, - कसबा, जि. पुणे
७) १५ जुलै १८४९ रोजी नायगांव, ता. खंडाळा, जि. पुणे
८) १८ जुलै १८४९ रोजी शिरवळ, ता. खंडाळा जि. पुणे
९) १ सप्टेंबर १८४९ रोजी तळेगांव ढमढेरे, जि. पुणे
१०) ८ सप्टेंबर १८४९ रोजी शिरुर, जि. पुणे.
११) ३ मार्च १८५० रोजी अंजीरवाडी, माजंगाव
१२) ६ मार्च १८५० रोजी करंजे, जि. सातारा
१३) १९ सप्टेंबर १८५० रोजी भिंगार
१४) १ डिसेंबर १८५० रोजी मुंढवे, जि. पुणे
१५) ३ जुलै १८५१ रोजी अण्णासाहेब चिपळुणकर वाडा, पुणे
१६) १७ सप्टेंबर १८५१ रोजी रास्ता पेठ, पुणे
१७) १ डिसेंबर १८५१ रोजी नाना पेठ, पुणे
१८) १५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठ, पुणे

अवघ्या चार वर्षाच्या कालखंडात अनंत अडचणीवर मात करुन इतक्या शाळा काढुन चालवणे हे सोपे काम नव्हते. देशातील हे पहिले उदाहरण होय.[७] येथे त्या शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या. वरील पहिले पाचही शाळामध्ये सावित्रीबाई फुले यांचे समवेत शिकविण्याचे काम फातिमा शेख यांनी केले.

फातिमा शेख यांचे भाऊ उस्मान शेख हे महात्मा फुले यांचे मित्र होते. महात्मा फुले मुलीना शिकवतात म्हणून रुढीवादी मंडळीनी त्यांची तक्रार त्यांच्या वडिलांकडे गोविंदराव फुले यांनी महात्मा फुले यांच्या पुढे दोन पर्याय ठेवले. एक तर घर सोडणे किंवा शाळा बंद करणे. महात्मा फुले यांनी शाळा सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला आणि वडिलांचे घर सोडले. याप्रसंगी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुलेयांना आश्रय देण्याचे काम उस्मान शेख आणि फातिमा शेख यांनीच केले.

उस्मान शेख: गंजपेठेत राहणारे ज्योतिराव फुले यांचे हितचिंतक वडिलांच्या राहत्या घरातुन गृहत्याग केल्यानंतर यांनीच गंज पेठेतील आपल्या एका मित्राचया घरात जागा मिळवून दिली. स्वत:ची भांडीकुंडी व संसारापयोगी साहित्य देवून फुले दांपत्यांच्या नवीन संसार थाटून दिला व तयांना दु:खद प्रसंगी धीर दिला.

फातिमा शेख यांच्या विषयी अधिक संशोधन झाले तर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केशवपनाविरुद्ध दिलेला लढा, दुष्काळ निवारणाचे केलेले कार्य, सुरु केलेले बालहत्या प्रतिबंधक गृह,सत्यशोधक समाजाची स्थापना यामध्ये फातिमा शेख यांचे योगदान होते. ज्योतिबांच्या मत असे असायचे की, स्त्रिया सुधारल्या तर घर सुधारेल, घर सुधारले तर गाव सुधारेल, गाव सुधारले तर राष्ट्र सुधारेल अशी त्यांची धारण होती.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचीकार्य हे काळाचया फार पुढचे होते. स्त्री शिक्षणाची कुणी कल्पनाही करु शकणार नाही. अशा त्या काळामध्ये त्योनी मुलींचया शाळा सुरू केल्या अणि अशया फुले दांमपत्यावरजेव्हा जेव्हा संकटे आली तेवहा तेवहा त्यांच्या पाठीशी उस्मान शेख आणि फातिमा शेखहे ख्बीरपणे उभे राहिले. महात्मा फुले, सावित्रीबाई, फातिमा शेख यांच्या घरातच पहिले वाचनालय सुरु केले, आणि या वाचनालयाच्या सहसंस्थापक होत्या. सावित्रीबाई यांच्या वाट्याला दगड – धोंडे

आले याचा इतिहास आमच्यापर्यंत पोहोचला परंतु त्यातील किती दगड हे फतिमा शेख यांनी झेलले याची माहिती आमच्यापर्यंत पोहोचू शकली नाही.

आपल्या सर्वाना ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले माहिती आहेतच ज्योतिरावच्या प्रोत्साहनामुळे सावित्रीबाई मुलीची शाळा सुरू करणा-या देशातल्या पाहिल्या महिला शिक्षिका बनल्या. तर त्याच शाळेत त्यांच्या एक सहकारी होत्या. त्याच या फातिमा शेख होय. सावित्रीबाईच्या खांदयाला खांदा लावून फातिमाजीनी पहिली मुलीची शाळा उभारण्यात व ती यशस्वी रित्या चालवण्यात मोलाचे योगदान दिले आहे.

१८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनाच्या शेवटी फुले म्हणतात, “सरतेशेवटी मला शिक्षण आयोगाला एक विनंती करावयाची आहे. ती ही आहे की, त्याने स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणखी मोठया प्रमाणावर होईल, अशा प्रकारच्या उपाययोजना संमती दयावी.”[८]

शाळेच्या व्यवस्थापन मंडळासमोर अनंत अडचणींचा असा डोंगर उभा असताना विदयेचे महत्तव ज्योतीराव फुले खालीलप्रमाणे सांगत होते-

“विदयेविना मती गेली मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली गतीविना वित्त गेले
वित्तेविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविदयेने केले.”[९]

सावित्रीबाई हे विचार आपल्या “श्रेष्ठ धन” व “अज्ञान” या कवितांत व्यक्त केले आहेत. “श्रेष्ठ धन” या कवितेत सावित्रीबाई म्हणतात.

“अभ्यास करी विदयेचा । विदयेस देव मानून
घे नेटाने तिचा लाभ मनी एकाग्र होऊन
विदया हे धन आहे रे । श्रेष्ठ सा-या धनाहून
तिचा साठा जयापाशी । ज्ञानी तो मानती जन”

विदया हे श्रेष्ठ धन होय तर अज्ञान हा आपला शत्रू व शुद्रांच्या परावलंबानाला कारणीभूत होणारी बाब आहे.[१०]

सावित्रीबाईचे महात्मा फुले यांना पत्रलेखन करतांना सांगतात की, सावित्रीबाईना फातिमांची किती साथ होती. ते एका पत्रातुन त्या म्हणतात. की, “ माझी काळजी करु नका, तब्येत ठीक होताच मी पुण्यात परत येईल. फातिमाला सध्या त्रास होत असेल पण ती कुरकुर करणार नाही” अशा या धाडसी शिक्षिकेबदृल फारशी माहिती उपलब्ध नाही. ज्योतिराव आणि सावित्रीबाई बदृल लिहिणा-या काही मोठया लेखकांनाही या बदृल फातिमाजी अपुरी माहिती आहे.[११]

**सारांश :**

भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका आणि समाजसुधारक फातिमा शेख यांचे नाव आदराने घेतले जाते. पण त्या पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई यांच्या सोबती होत्या. कारण, जसा सावित्रीबाईच्या कार्याची माहिती मिळते. तसा फातिमाजींच्या कार्याची माहिती मिळत नाही.

सहसा आपल्याला आपल्या पूर्वजांविषयी माहिती असतं, इथे पूर्वज म्हणजे पुरूष हे आपण गृहीत धरतो शेकडो वर्ष फक्त पुरुषांसाठी केलेल्या गोष्टीनाच समाजप्रती असणारे हे भरीव योगदान समजल गेल आहे. मग भले मोठ्यातल्या मोठ्या संकटातून घराला तारूण नेणारी बाई असली तर नाव लागतं पुरूषांचच न हेळवीचे गावोगावी भटकून लोकांच्या घराण्याचे मूळ कुठून आले हे सांगतात. ते सुद्धा पुरुषांचीच नावे लिहतात, एखादया व्यक्तीची पत्नी तिची मुलगी एवढाच काय तो बाईचा उल्लेख त्याचप्रमाणे देशाला, समाजाला मोठं करणा-या महिला अनामिक राहतात. अनेकदा त्यांचा साधा नामोल्लेखही कुठे केला जात नाही. त्यांनी केलेले कार्य दुर्लक्षित केले जाते. अशाच प्रकारचया आपल्या फातिमा शेख.

**संदर्भ :**

१) अबला होई प्रबला- चंपा लिमये, श्री विदया प्रकाशन पृ. १३६, मध्ययुगीन भारत – प्रा. गजानन भिडे, डॉ. विजय नलावडे, डॉ. सौ. वैजंयती नाईकनवरे पृ ७६

२) कित्ता

३) कित्ता

४) स्त्री – ले. गो.द. कुलकर्णी पृ.६

५) ब्रिटिश

६) युगपुरूष महात्मा ज्योतीराव फुले- स्त्री शिक्षणाचे क्रांतिकार्य – बा. ग. पवार पृ.३९

७) युगपुरुष महात्मा ज्योतीराव फुले – स्त्री शिक्षणाचे क्रांतिकार्य – बा. ग. पवार पृ. ४०

८) हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन- समग्र वाङ:मय पाचवी आवृत्ती २८ नोव्हेंबर १९९१ पृ.५१९,

९) सावित्रीबाई फुले – अष्टपैलू व्यक्तिमत्व – प्रा. ना. ग. पवार पृ ५६

१०) सावित्रीबाई फुले – अष्टपैलू व्यक्तिमत्व – प्रा. ना. ग. पवार पृ ५७.५८

११) पत्रलेखन – सावित्रीबाई ज्योतिबा फुले – शांता रानडे पृ ९